Area – A Perspectives in Education ( B.Ed. Second Year)

P5 – Guidance, Counseling and Inclusive Education

Annual Pattern ( w.e.f. June 2020)


# Prof. Dr. B.J. Mundhe

**M.A.(English), M.Ed. SET(Education), Ph.D.(Education)**
Professor in Education with English Method
Janata Shikshan Mandal's,
Sane Guruji Vidya Prabodhini,
Comprehensive College of Education, Khiroda.
Tal Raver Dist. Jalgaon- 425504 ( M.S.)

Mo.No.9730586944 (Whats App)

Email: drbjmundhe@gmail.com

# पी  - ५ मार्गदर्शन, समुपदेशन आणि सर्वसमावेशक शिक्षण

## प्रकरण -पहिले :  शैक्षणिक आणि व्यवसायिक मार्गदर्शनाचे आकलन

१.१ अर्थ, मार्गदर्शनाची गरज:

- प्रत्येक व्यक्तीस जीवनाच्या विविध अवस्थांत मार्गदर्शनाची गरज असते
- मानवी समाजाच्या उत्पत्तीपासुन मार्गदर्शनाची गरज भासत आली आहे.
- भौतिक विकासाबरोबर मानवी जीवन व मानवी समाज हा अत्यंत गुंतागुंतीचा होत चालला आहे.
- कोणत्याही क्षेत्रात तज्ज्ञ व्यक्तीची गरज भासु लागली आहे.

## **मार्गदर्शनाचा अर्थ व व्याख्या :**

१.२ मार्गदर्शन म्हणजे काय?

- कोणत्याही विदयार्थ्यांच्या बाबतीत शिकणे अथवा समजणे, यात समजण्यास मदत करणे, त्यात अथवा त्याच्या वातावरणात बदल घडवून त्याच्या वाढ आणि विकासात मदत करणे या प्रक्रियेस मार्गदर्शन असे म्हणतात. - नॅप
- मार्गदर्शन म्हणजे व्यक्तीसाठी व समाजासाठी अधिकाधिक फायदेशीर दिशेने त्याच्या प्रस्तावित अधिकतम क्षमतेपर्यंत विकास करण्यास मदत करणरी व सतत चालणारी प्रक्रिया म्हणजेच मार्गदर्शन होय. - स्ट्रॅप्स आणि लिंड क्विस्ट
- व्यक्तीस स्वत:चे मार्गदर्शन स्वत: करण्यासाठी समर्थ करणारी प्रक्रिया म्हणजेच मार्गदर्शन होय. - ब्रेवर जे. एम.
- वैयक्तिक व सामाजिक उन्नत्तीसाठी स्वप्रयत्नाने सुप्त गुण शोधुण त्यांच्या विकासासाठी साहाय्यक होणारी प्रक्रिया म्हणजेच मार्गदर्शन होय.

## १.३ शैक्षणिक मार्गदर्शनाचा अर्थ व व्याख्या :

- शाळा, अभ्यासक्रम, पाठयक्रम व शालेय जीवनाशी संबंधित (प्रश्नांसंबधी) निवडी व समायोजन या बाबतीत विदयार्थ्यांना करावयाच्या मदतीशी शैक्षणिक मार्गदर्शन संबंधित असते. - - जोन्स
- अध्ययनाचा योग्य कार्यक्रम (अभ्यासक्रम) निवडण्यास व त्यात प्रगती करण्यास मदत करण्यासाठी शैक्षणिक मार्गदर्शन असते. - - रूथ स्ट्रॅग

## १.४ मार्गदर्शनाचा अर्थ व विविध अंगे :

१) मार्गदर्शनाचा सर्व भर मार्गदर्शन घेऊ इच्छिणा-यावर असतो. त्याच्या पुढील समस्येवर नाही.

२) मार्गदर्शन व्यक्तित स्वत: करण्यासाठी व स्वत:चा मार्ग स्वत:सापडविण्याची कुवत निर्माण करण्यास मदत करते.

३) मार्गदर्शनाच्या योगे व्यक्तीत स्वत:ची कुवत व मर्यादा यांची जाणीव होणे आवश्यक असते.

४) मार्गदर्शनामुळे व्यक्तीत स्वत:शी, इतरांशी वा परिस्थितीशी समायोजन करण्याची कुवत निर्माण होते.

५) मार्गदर्शन व्यक्तीस समाधानी होण्यास मदत करते.

६) मार्गदर्शनाच्या मदतीने व्यक्ती स्वत:च्या वर्तनात योग्य बदल घडवून आणवू शकते.

७) मार्गदर्शन व्यक्तीच्या स्व-प्रयत्नांना उत्तेजन देते.

८) मार्गदर्शनामुळे व्यक्तीस स्वत:चा विकास करणे सुकर जाते.

## १.५ मार्गदर्शनाची गरज:

- व्यक्ती भिन्नता
- कुटुंब व्यवस्थेतील बदल
- औदयोगिकरणाचा वाढता वेग
- जीवन सुखी व यशस्वी करण्यासाठी
- व्यवसायिक कौशल्य प्राप्तीसाठी
- प्रसारमाध्यमातील झालेली वाढ व त्यातील गुंतागुंत कमी करण्यासाठी
- ज्ञान शाखांचा वेगाने होणारा विकास

# To be Continued.....

- निर्णय क्षमता विकसित करण्यासठी
- फुरसतीच्या वेळेचा सदउपयोग करण्यासाठी
- सुजान नागरिकत्व घडविण्यासाठी
- गुणात्मक वाढीच्या प्रयत्नांसाठी
- मागासलेल्यांना पुढे आणण्यासाठी
- सुजान नेतृत्त्व निर्मितीसाठी
- राट्रीय आणि वैश्विक एकात्मतेसाठी

## १.२ कारकिर्द मार्गदर्शनाची उदिदष्टे : (Objectives of the career Guidance)

- १.२ कारकिर्द मार्गदर्शनाची उदिदष्टे : (Objectives of the career Guidance)
- १.२.१ स्व-आकलन / स्व-समज: (self-understanding)
- १.२.२ स्व-शोध / आत्मशोध : (self-discover)
- १.२.३ स्वावलंबन : (self-reliance)
- १.२.४ स्व-निर्देशन: (self-direction)
- १.२.५ आत्मप्रचिती / स्व- साक्षात्कार : (self-actualization)

# १.३ कारकिर्द मार्गदर्शन : (Career Guidance)

१.३ कारकिर्द मार्गदर्शन : (Career Guidance)

- कारकिर्द मार्गदर्शन व्याख्या : कारकिर्द मार्गदर्शन म्हणजे व्यवसायिक परिसराची माहिती देणे. विविध प्रकारच्या व्यवसायामधून, व्यवसाय निवड कर्त्याच्या पूर्ण क्षमतांचा विचार करून व्यवसाय निवडीचा सल्ला देणे किंवा उपदेश करणे म्हणजेच कारकिर्द मार्गदर्शन होय.
- करकिर्द मार्गदर्शन म्हणजे व्यवसायिक परिक्षेत्र निवडण्यासाठी, निवडलेल्या परिक्षेत्रात प्रवेश मिळवून देवून योग्य तो विकास करण्यासाठी जाणिवपूर्वक केलेल्या मदतीची / साहाय्याची प्रक्रिया होय. कारकिर्द मार्गदर्शन ही अखंड व अव्याहत चालणारी प्रक्रिया आहे.
- जी प्रक्रिया व्यक्तिचा विकास, एकात्मता आणि त्याचे परीपूर्ण चित्रण स्विकारण्यास, त्याची कार्यजगतातील भूमिका व संकल्पना वास्तवाच्या पार्श्वभूमीवर समाधानाने स्वत:करण्यास आणि समाजास फायदा करण्यास वचनबध्द असते.यासच कारकिर्द मार्गदर्शन असे म्हणतात.

## १.४ कारकिर्द मार्गदर्शन : (Career Guidance)

१.४ कारकिर्द मार्गदर्शन कार्यक्रम व्याप्ती : (Scope of Career Guidance)

१.४.१ व्यवसायिक मार्गदर्शनाने विदयार्थ्यांमधे बौध्दिक व शारीरिक श्रमांविषयी आदरयुक्त भावना तयार करण्यास कारकिर्द मार्गदर्शन उपयोगी पडते.

१.४.२ विविध शैक्षणिक संस्थामध्ये चालणा-या विविध व्यवसायिक उपक्रमांची, व्यवसायिक संधींची माहिती देण्यास कारकिर्द मार्गदर्शन साहाय्य करते.

१.४.३ व्यवसायिक प्रशिक्षणास लागू असलेल्या सुविधा व शिष्यावृत्त्या यांची सविस्तर माहिती विदयार्थ्यांना उपलब्ध करून देण्यास कारकिर्द मार्गदर्शन उपयोगी पडते.

## १.४ कारकिर्द मार्गदर्शन : (Career Guidance)

१.४.४ व्यवसाय जगताचा अनुभव घेवू देण्यास केलेले मार्गदर्शन हे नेहमीच उपयोगी पडते. हे वारंवार सिध्द झालेले आहे.

१.४.५ कारकिर्द मार्गदर्शन हे विदयार्थ्यांना त्यांची क्षमता, अभिरूची व वृत्ती या अनुषंगाने व्यवसाय निवडण्यास मदत करते.

१.४.६ विद्यार्थ्यांनी व्यवसायाची निवड केल्यावर तेथील व्यवसायाचे वातावरण व अन्य सहकारी यांच्याशी योग्य समायोजन करण्यास कारकिर्द मार्गदर्शन साहय करते.

## १.४ कारकिर्द मार्गदर्शन : (Career Guidance)

१.४.७ कारकिर्द मार्गदर्शन हे विद्यार्थ्यांना ते निवडत असलेल्या व्यवसायाची वैशिष्टये, जबबदा-या आणि कामाचे स्वरूप यांची माहिती देण्यास किंवा मिळविण्यास अत्यंत उपयोगी पडते.

१.४.८ कारकिर्द मार्गदर्शन हे व्यवसायाच्या गरजा पूर्ण करण्यास, स्वत:च्या क्षमता व कसब यांची विद्यार्थ्यांना जाणीव करून देते.

१.४.९ कारकिर्द मार्गदर्शन हे विद्यार्थ्यांना अभिरूचीनुसार व क्षमतेनूसार शिक्षण, व्यवसाय योग्य प्रकारे करण्यास अत्यंत उपयुक्त ठरते.

१.४.१० योग्य त्या कारकिर्द मार्गदर्शनामुळे आवडीचा व्यवसाय (Passionate Profession) निवडणे सुलभ होते.

## १.५ कारकीर्द व्यवसायावर परिणाम करणारे घटक: (Process and Factors affecting Career Development)

सामान्यपणे खालील घटक कारकीर्द व्यवसायावर परिणाम करताना आढळून येतात.

१. वैयक्तिक समुपदेशन (Personal counseling)

२. परिपुर्ती मूल्यमापन (Performance appraisal)

३. कारकीर्द पर्याय पडताळणी (Career mapping)

४. व्यवसाय निवड / ओळख (Identification of business)

५. कारकीर्द ध्येय संपादन (Achieving career goals)

६. वैयक्तिक व्यक्तिमत्त्व विकास (Personal Development)

७. कारकीर्द संबंधी शिक्षण (Career related Education)

८. कारकीर्द विषयक पुरेशी माहिती (Career related information)

९. कारकीर्द विकासात वेगाने झालेली वाढ (The increase in career development)

१०. बेरोजगारीची समस्या (Unemloyment problem)

११. सादरीकरण विषयक कौशल्ये (Presentation skills)

## **१.६ कारकीर्द विकास ही विद्यार्थ्यांची मुख्य गरज: (Career development need of the students)**

सामान्यपणे खालील घटकांवरून कारकीर्द विकास ही मुख्य गरज आहे असे स्पष्ट होते.

१. मागणीच्या तुलनेत कारकीर्द विषयक अपु-या संधी

२. व्यवसायिक संधींची जीवघेणी स्पर्धा त्यामुळे सुरूवातीपासुनच सूक्ष्म नियोजन आवश्यक

३. वाढत्या लोकसंख्येचा प्रस्फोट

४. रोजगार प्राप्तीच्या प्रक्रियेतील जीवघेणा संघर्ष

५. व्यवसायिक शिक्षणाची स्पर्धा

६. व्यवसायिक संधी आणि वाढता भ्रष्टाचार

७. कौशल्याधिष्ठित शिक्षणाचा अभाव

८. निवडक व्यवसाय शिक्षणाच्या अपु-या संधी (उदा.वैद्यकीय शिक्षण, उच्च दर्जाचे अभियांत्रिकी शिक्षण-आयआयटी)

९. व्यवसाय वृध्दीसाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा तुटवडा

१०. व्यवसायाभिमुख शासकीय धोरणांचा अभाव

## प्रकरण दुसरे: शैक्षणिक मार्गदर्शन कार्यक्रमांतर्गत असणा-या अत्यावश्यक सेवा
## (Unit:२ Essential Services in Educational Guidance Programme)

**२.१ मार्गदर्शन  सेवांचे प्रकार: (Types of Guidance Services)**

१. उद्‌बोधन सेवा (Orientation Service)

२. माहिती सेवा (Information Service)

३. समुपदेशन सेवा (Counseling Service)

४. स्थान निश्चिती सेवा (Placement Service)

५. अनुधावन / पाठपुरावा सेवा (Follow up Service)

६. संशोधन व मूल्यमापन सेवा (Research & Evaluation Service)

७. वैयक्तिक माहिती संकलन सेवा (Individuan Data Collection  Service)

८. आत्मसंशोधन सेवा (Self-inventory Service)

९. उपक्रम सेवा (Preparatory Service)

## २.२ शालेय मार्गदर्शन समिती: (School Guidance Committee)

- शालेय मार्गदर्शन समितीची रचना: (Constitution of the School Guidance Committee)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अ. ब. क. | मुख्याध्यापक | - अध्यक्ष |
| २. | अ. ब. क. | पर्यवेक्षक | - उपाध्यक्ष |
| ३. | अ. ब. क. | ज्येष्ठ शिक्षक | - सचिव |
| ४. | अ. ब. क. | ज्येष्ठ शिक्षक | - सदस्य |
| ५. | अ. ब. क. | ज्येष्ठ शिक्षक | - सदस्य |
| ६. | अ. ब. क. | ज्येष्ठ शिक्षक | - सदस्य |
| ७. | अ. ब. क. | ज्येष्ठ शिक्षिका | - सदस्य |
| ८. | अ. ब. क. | शिक्षण तज्ज्ञ | - सदस्य |
| ९. | अ. ब. क. | प्रशिक्षित समुपदेशक | - सदस्य |
| १०. | अ. ब. क. | परिसरातील वैद्य | - सदस्य |
| ११. | अ. ब. क. | पालक प्रतिनिधि सदस्य | - सदस्य |

## २.३ शालेय मार्गदर्शन समितीची भूमिका आणि कार्य:

१. शालेय विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम,सह अभ्यासानुवर्ती उपक्रम व अभ्यासेत्तर उपक्रम यांची सविस्तर नियोजन करून माहिती देणे.

२. विद्यार्थ्यांना यशस्वी व गुणवत्तापूर्ण अध्ययनासाठी पूरक वातावरण निर्मिती करून त्यांना प्रेरीत करण्यास मदत करणे.

३. विद्यार्थ्यांना शिक्षणाप्रती अधिक जिज्ञासू व सजग होण्यास मदत करणे.

४. विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनाच्या चांगल्या सवयी विकसित करून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस हातभार लावणे.

५. एखादया शिक्षण तज्ञाचे व्याख्यान आयोजित करून व्यक्तिमत्त्व विकास कसा घडवून आणावा ? याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जाणिव जागृती घडवून आणणे.

६. पर्यावरणाचे जतन व संवर्धन करण्यासाठी मोठया प्रमाणावर वृक्षारोपन कार्यक्रम हाती घेणे.

७. परिसरातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांच्या मदतीने आरोग्य शिबीराचे आयोजन करून शारिरीक आरोग्याबद्दल उदा. वैयक्तिक स्वच्छता, खाण्यापिण्याच्या योग्य सवयी, शौचालयाचा यथोचित वापर, योग्य त्या सवयी रूजवण्यास मदत करणे.

**क्रमश.......**

८. दहावी बारावीनंतर पुढे काय? पुढील कारकीर्द मार्गदर्शन करण्यासाठी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक / शिक्षिका तसेच तज्ञांचे वेळोवेळी विविध व्याख्यांनाद्वारे मार्गदर्शन कार्यक्रम घडवून आणणे.

९. मागासवर्गीय व गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य खरेदी करण्यासाठी अर्थसाहय उपलब्ध करून देणे.

१०. ज्यांच्या घरी अभ्यास पुरक वातावरण तसेच सोयी सुविधा नाहीत अशासाठी शाळेतच अभ्यासिकेची सोय उपलब्ध करणे.

११. व्यवसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवून देण्यासाठी प्रवेश परीक्षेची तयारी व्हावी म्हणून विशेष सुविधा उपलब्ध करणे.

१२. विद्यार्थ्यांनी स्वयं -अध्ययन करावे म्हणून इंटरनेटच्या वायफाय (Wi-Fi) सुविधेसह  संगणक प्रयोगशाळा उपलब्ध करून देणे.

१३. विद्यार्थ्यांना सर्व अंगाने अभ्यास करता यावा म्हणून अद्यावत ग्रंथालय उपलब्ध करून दयावे.

१४. विद्यार्थ्यांचे शारिरीक सौष्ठत्त्व वाढीस लागावे म्हणून वर्षेभर अधूनमधून क्रीडास्पर्धांचे आयोजन करणे.

१५. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून यावा म्हणून स्नेहसंम्मेलनासारखे कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांच्या संस्कृतिक विकासाची पायाभरणी करावी.

## २.४ शालेय अभ्यासक्रमातील मार्गदर्शनाचे स्थान: (Place of Guidance in School curriculum)

- प्राथमिक स्तर :

१. शैक्षणिक योजना विवेकपूर्ण बनविण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत होते.

२. उच्च माध्यमिक शाळेत प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना तयार करण्यास सहकार्य मिळते.

३. विद्यार्थ्यांना शैक्षणिक जिवनाची चांगली सुरूवात करण्यास मानसशास्त्रीय पद्धतीने मदत होते.

४. शिक्षणापासून अधिकाधिक फायदा करण्यास विद्यार्थ्यांना सहाय्य होते.

क्रमशः

- माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरः

१. उद्‍बोधन सेवा (Orientation Service)

२. माहिती सेवा (Information Service)

३. समुपदेशन सेवा (Counseling Service)

४. स्थान निश्चिती सेवा (Placement Service)

५. अनुधावन / पाठपुरावा सेवा (Follow up Service)

६. संशोधन व मूल्यमापन सेवा (Research & Evaluation Service)

७. वैयक्तिक माहिती संकलन सेवा (Individuan Data Collection Service)

८. आत्मसंशोधन सेवा (Self-inventory Service)

९. उपक्रम सेवा (Preparatory Service)

## २.५ शालेय मार्गदर्शन कार्यक्रमामध्ये शिक्षक आणि प्राचार्य यांची भूमिका:

(Role of principal and teachers in school guidance programmes)

१. विद्यार्थ्यांच्या गरजानूसार वर्ग, अनुभव, समुहात व कक्षात त्यांचे वर्गीकरण करून त्यांना योग्य ते सहाय्य करणे.

२. विशेष गरजा असलेल्या व कुशाग्र बुद्धीच्या बालकांच्या अवश्यक विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे.

३. समाजातील असमायोजित आणि विकलांग बालकांच्या पर्याप्त गरजांकडे लक्ष देणे.

४. अध्ययनात मागे राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुनर्रअध्यापनासाठी उपचारात्मक अध्यापनाचे वर्ग आयोजित करणे.

५. अभ्यासक्रम विषयक, अभ्याक्रमपूरक व अभ्यासेत्तर उपक्रमांचे नियोनपूर्वक आयोजन करून उद्दिष्टये साध्य झाल्याची खात्री करणे.

६. समाजातील अर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना शासन अथवा इतर माध्यमे यांच्या मार्फत आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे.

क्रमश:

७. दहावी बारावीनंतर पुढे काय? पुढील कारकीर्द मार्गदर्शन करण्यासाठी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक / शिक्षिका तसेच तज्ञांचे वेळोवेळी विविध व्याख्यांनाद्वारे मार्गदर्शन कार्यक्रम घडवून आणणे.

८. मागासवर्गीय व गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य खरेदी करण्यासाठी अर्थसाहय उपलब्ध करून देणे.

९. ज्यांच्या घरी अभ्यास पुरक वातावरण तसेच सोयी सुविधा नाहीत अशासाठी शाळेतच अभ्यासिकेची सोय उपलब्ध करणे.

१०. व्यवसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवून देण्यासाठी प्रवेश परीक्षेची तयारी व्हावी म्हणून विशेष सुविधा उपलब्ध करणे.

११. विद्यार्थ्यांनी स्वयं -अध्ययन करावे म्हणून इंटरनेटच्या वायफाय (Wi-Fi) सुविधेसह संगणक प्रयोगशाळा उपलब्ध करून देणे.

१२. विद्यार्थ्यांना सर्व अंगाने अभ्यास करता यावा म्हणून अद्यावत ग्रंथालय उपलब्ध करून दयावे.

१३. विद्यार्थ्यांचे शारिरीक सौष्ठत्त्व वाढीस लागावे म्हणून वर्षभर अधूनमधून क्रीडास्पर्धांचे आयोजन करणे.

१४. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून यावा म्हणून स्नेहसंम्मेलनासारखे कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांच्या संस्कृतिक विकासाची पायाभरणी करावी.